गोवा सरकार
माहिती आणि प्रसिध्दी खाते
पणजी-गोवा
वार्तापत्र

## 14 जूनपासून एसएससी परीक्षेस प्रारंभ

ता. 12 जून 2019
22 ज्येष्ठ 1941

गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाने 14 ते 21 जूनपर्यंत शालांत पूरवणी परीक्षेचे आयोजन केले आहे.

शालांत जून 2019 परीक्षा संबंधित तारखांची यादी मंडळाच्या  या संकेत स्थळावर पाहता येते.

सदर परीक्षा दोन सत्रात होणार आहे. सकाळचे सत्र सकाळी 9.30 वाजता आणि संध्याकाळचे सत्र दुपारी 2.30 वाजल्यापासून सर्व श्रेणीसाठी सुरू होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येत आहे की त्यांनी आपल्या संबंधित परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू होण्याअगोदर 30 मिनीटे आधी पोहचावे.

परीक्षा पाच केंद्रात घेण्यात येईल. ही केंद्रे खालीलप्रमाणे- सर्वोदय शैक्षणिक संस्था हायस्कुल कुडचडे, पीओ क्र. 21, जनता हायस्कुल म्हापसा, होली स्पीरीट संस्था, मडगांव, डॉ. के. बी. हेडगेवार हायस्कुल, कुजीरा बांबोळी आणि फोंडा येथील एसएस समितीच्या श्रीमती इंदिराबाई व्ही भट ढवळीकर हायस्कुल ढवळी.

शालांत जून परीक्षेसाठी 1379 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे (मुले 728 आणि मुली 651) .

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/321